…वाजी विद्यापीठ, को…
12 MAR 2026

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## ऑनलाईन एम.बी.ए. प्रवेश मुदत वाढ सूचना

### (जानेवारी २०२६ सत्र)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत UGC व AICTE मान्यता प्राप्त ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ सत्रासाठीचे प्रवेश अर्ज दि.२८/०२/२०२६ पर्यंत पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रवेशाची मुदत दि.३०/०३/२०२६ पर्यंत वाढविण्यात आली असून विद्यार्थ्यांनी आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत सादर करावेत.

याबाबतचा माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळ https://online.unishivaji.ac.in/admissions/ यावर उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी अधिकच्या माहितीसाठी ०२३१ -२६०९४०९/२६०९१०५ या क्रमांकावर अथवा cdoe@unishivaji.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

प्रवेश घेण्याकरीता वरील QR Code स्कॅन करा.

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/१७६
दि. १२/०३/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

12 MAR 2026

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## ऑनलाईन एम.बी.ए. प्रवेश मुदत वाढ सूचना

### (जानेवारी २०२६ सत्र)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत UGC व AICTE मान्यता प्राप्त ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ सत्रासाठीचे प्रवेश अर्ज दि.२८/०२/२०२६ पर्यंत पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रवेशाची मुदत दि.३०/०३/२०२६ पर्यंत वाढविण्यात आली असून विद्यार्थ्यांनी आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत सादर करावेत.

याबाबतचा माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळ https://online.unishivaji.ac.in/admissions/ यावर उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी अधिकच्या माहितीसाठी ०२३१ -२६०९४०९/२६०९१०५ या क्रमांकावर अथवा cdoe@unishivaji.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

प्रवेश घेण्याकरीता वरील QR Code स्कॅन करा.

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/१७६
दि. १२/०३/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

जनसंपर्क कक्ष

12 MAR 2026 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## ऑनलाईन एम.बी.ए. प्रवेश मुदत वाढ सूचना

(जानेवारी २०२६ सत्र)

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत UGC व AICTE मान्यता प्राप्त ऑनलाईन एम.बी.ए. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी २०२६ सत्रासाठीचे प्रवेश अर्ज दि.२८/०२/२०२६ पर्यंत पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रवेशाची मुदत दि.३०/०३/२०२६ पर्यंत वाढविण्यात आली असून विद्यार्थ्यांनी आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने विहित मुदतीत सादर करावेत.

याबाबतचा माहितीचा तपशील विद्यापीठ संकेतस्थळ https://online.unishivaji.ac.in/admissions/ यावर उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी अधिकच्या माहितीसाठी ०२३१ -२६०९४०९/२६०९१०५ या क्रमांकावर अथवा cdoe@unishivaji.ac.in या ई-मेलवर संपर्क साधावा.

प्रवेश घेण्याकरीता वरील QR Code स्कॅन करा.

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/१७६
दि. १२/०३/२०२६

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

1 2 MAR 2026
सकाळ



अर्जुननगर : येथील देवचंद महाविद्यालयात आयोजित क्रीडा महोत्सवात विजेत्या खेळाडूंसमवेत प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, डॉ. रवींद्र चव्हाण आदी.

# देवचंद महाविद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात

**नानीबाई चिखली :** अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात झाला. मैदानी क्रीडा प्रकारात सर्वाधिक गुण मिळवून मुलांमध्ये आदर्श पाटील, तर मुलींमध्ये श्रद्धा पाटील यांनी वैयक्तिक चॅम्पियनशिप मिळवली. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे यांच्या हस्ते झाले. क्रीडा महोत्सवाची सुरुवात वैयक्तिक क्रीडा प्रकारातील बुद्धिबळ, कॅरम सिंगल, डबल, बॅडमिंटन, टेबल टेनिस व वेटलिफ्टिंग या स्पर्धांनी झाली. यानंतर सांघिक क्रीडा प्रकारातील क्रिकेट, कबड्डी व व्हॉलीबॉल या स्पर्धा झाल्या. मैदानी क्रीडा प्रकारातील धावणे, उडी मारणे या स्पर्धेने महोत्सवाचा समारोप झाला. यावेळी विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. संस्थाध्यक्ष आशीष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, डॉ. पी. डी. शिरगावे यांचे प्रोत्साहन लाभले. जिमखानाप्रमुख डॉ. रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे महोत्सवासाठी योगदान लाभले.

12 MAR 2026

सकाळ

# आंतरविभागीय शरीरसौष्ठव स्पर्धेत श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** श्री व्यंकटेश महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातर्फे आयोजित आंतरविभागीय शरीरसौष्ठव स्पर्धेत यश मिळविले. स्पर्धेत बी.कॉम. (आयटी) विभागातील आयुष शेट्टीने ५५ किलो गटात विद्यापीठस्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच बी. कॉम. विभागातील पार्थ जाधवने ८० किलो गटात तृतीय क्रमांक पटकावला. दरम्यान, ज्युनिअर मिस्टर इंडिया व ज्युनिअर महाराष्ट्र दिव्यांग शरीरसौष्ठव स्पर्धेत बी.कॉम भाग ३ चा विद्यार्थी पारस सरुडकर याने ६० किलो गटात द्वितीय क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यांना शारीरिक शिक्षण विभागाचे प्रमुख प्रा. ए. आय. बाणदार यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAR 2026
सकाळ

# आनंद भवनात शनिवारी 'फार्मा करंडक' : डॉ. मोरे

## फार्मसी विद्यार्थ्यांचा शनिवारी रंगणार सांस्कृतिक जल्लोष


कोल्हापूर, ता. ११: शिवाजी विद्यापीठअंतर्गत फार्मसी महाविद्यालयातर्फे 'फार्मा करंडक' या सांस्कृतिक महोत्सवाचे शनिवारी (ता. १४) आयोजन केले आहे. हा महोत्सव सायबर कॉलेजच्या आनंद भवन सभागृहात सकाळ नऊ वाजता सुरू होणार आहे. अशी माहिती भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. हरिनाथ मोरे यांनी दिली.

फार्मसीच्या विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव मिळावा, त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दरवर्षी या महोत्सवाचे आयोजन केले जाते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांत सांघिक भावना, नेतृत्वगुण आणि सामाजिक जाणीव वाढीस लागावी, यावर भर दिला आहे. यंदा फार्मा करंडक हा केवळ सांस्कृतिक स्पर्धांचा कार्यक्रम नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारा उपक्रम आहे. या एकदिवसीय महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, गायन आदी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन केले आहे. यात कोल्हापूरसह सांगली, सातारा जिल्ह्यांतील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या ४८ फार्मसी महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना दोन सांघिक आणि दहा वैयक्तिक पारितोषिक देऊन गौरवण्यात येणार आहे. यावेळी प्राचार्य डॉ. अन्सार पटेल, प्राचार्य डॉ. सुरेश किल्लेदार, प्राचार्य डॉ. आदित्य अरविंदेकर, समन्वयक सुदर्शन अजित, प्रा. स्वप्नील हराळे आदी उपस्थित होते.

1 2 MAR 2026

पुढारी



कोल्हापूर : सृष्टी कुलकर्णीची ऑल इंडिया बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मान्यवर.

# सृष्टीची ऑल इंडिया बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**कोल्हापूर :** जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी सृष्टी कुलकर्णीने रौप्यपदक मिळवले. तिची मेरठ येथे होणाऱ्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी बुद्धिबळ महिला स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या संघामध्ये निवड झाली आहे. तिला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

12 MAR 2026

सकाळ

# प्रा. आरती चव्हाण यांना पीएच.डी.



आरती चव्हाण

कोल्हापूर, ता. ११ : डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागप्रमुख प्रा. आरती चव्हाण यांना शिवाजी विद्यापीठातील इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग विभागातून पीएच.डी. पदवी प्रदान केली. डॉ. चव्हाण यांनी 'डीप न्युरल नेटवर्क बेस्ड सॉईल नायट्रोजन, फॉस्फरस ॲन्ड पोटेशिअम इस्टिमेशन युझिंग इन्फ्रारेड स्पेक्ट्रोस्कोपी' यावर प्रबंध सादर केला होता. डॉ. युवराज पाटील, डॉ. अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे, प्रा. वीरेन भिर्डी, डॉ. सुहास सपाटे आदींचे सहकार्य लाभले.

12 MAR 2026

लोकमत

# अस्मिता भोसले - शिंदे यांना पीएच.डी.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या



शिक्षणशास्त्र अधिविभागाकडून अस्मिता भोसले-शिंदे यांनी पीएच. डी. मिळवली. डेव्हलपमेंट ऑफ प्रोग्रॅम फॉर एनहांसिंग जेन्डर सेन्सिटीव्हिटी अमंग अॅडॉलेसेंट्स हा त्यांच्या संशोधनाचा विषय होता. डॉ. कृष्णा पाटील तसेच दिवंगत डॉ. शोभा विठ्ठल काळेबाग यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांना शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांचे प्रोत्साहन मिळाले.

12 MAR 2026

जनप्रवास

# 'साक्षीदाराचा उलट तपास' मधून विधीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## • सूर्यकांत मिरजे यांच्या टिप्स; बारकाव्यांची माहिती



**जनप्रवास : जयसिंगपूर**

शिवाजी विधापीठ अंतर्गत, फलटण विधी कॉलेजमार्फत जयसिंगपूर येथील विशेष सरकारी वकील सूर्यकांत मिरजे यांनी 'साक्षीदाराचा उलटतपास' या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विविध प्रकरणांमधील बारकाव्यांची माहिती विधी कॉलेजच्या विद्यार्थ्यांना दिली.

महाराष्ट्रतील विविध विधी कॉलेजमधील विध्यार्थीनी यात सहभाग घेतला. साक्षीदाराचा उलटतपास हा गुणवत्तापूर्ण असला पाहिजे. तसेच उलटतपास घेण्यापूर्वी केसचा पूर्ण अभ्यास करून केस संदर्भात उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाचे निकाल वाचणे महत्वाचे असते. साक्षीदारास भीती अथवा दबाव निर्माण करून तसेच साक्षीदारास त्याचा अपमान, बदनामी होईल असे प्रश्न विचारता येत नाहीत.

साक्षीदाराने पोलीस जबाबात जे सांगितले आहे. त्यापेक्षा वेगळे न्यायालयात सांगत असल्यास त्या मुद्द्यावर उलट तपास करून साक्षीदाराचे जबाब कसे चुकीचे व संशयी आहे. ते न्यायालयाच्या निर्दशनास आणणे गरजेचे असते. फिर्याद देण्यास विलंब झाल्यास त्याबबत उलट तपासात प्रश्न विचारणे गरजेचे असते. मारामारीच्या प्रकरणात फिर्यादीची फिर्याद व त्याच्या वैद्यकीय अहवालाचा अभ्यास करून उलट तपास घ्यावा. असे विशेष सरकारी वकील सूर्यकांत मिरजे यांनी विधी कॉलेजच्या विध्यार्थीना आपल्या मार्गदर्शनात सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 2 MAR 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या ५८७ कोटी ७८ लाखांच्या अंदाजपत्रकास मंजुरी

कोल्हापूर : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२०२७ चे वार्षिक अंदाजपत्रक बुधवारी अधिसभेच्या मंजुरीसाठी सादर केले. या अंदाजपत्रकात २०२६-२०२७ ची एकूण अपेक्षित जमा ५७८ कोटी ८७ लाख रुपये असून अपेक्षित एकूण खर्च ५८७ कोटी ७८ लाख रुपये आहे व अंदाजपत्रकीय तूट ८ कोटी ९१ लाख रुपये इतकी आहे. ही तूट विद्यापीठ निधीतील शिल्लकेतून भरून काढण्यात येणार आहे. विद्यार्थी केंद्रित आणि संशोधनाला चालना देणाऱ्या या अंदाजपत्रकाला अधिसभा सदस्यांनी काही सूचना व दुरुस्तीसह अधिसभेत मंजुरी दिली.

दरम्यान, सन २०२४-२५ चा विद्यार्थी विकास मंडळाचा अहवाल आणि सन २०२४-२५ चा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल मान्य झाला. तर सन २०२४-२५ मधील विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा कुलसचिव यांचा अहवाल स्वीकृत झाला. विद्यापीठाचा सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ६२ वा वार्षिक अहवाल मान्य केला.

२०२६-२७ चे अंदाजपत्रकात विद्यार्थी, विद्यार्थीनी वसतिगृह दुरुस्तीसह अनुषंगिक सुविधांसाठी ११ कोटी ८१ लाख ९२ हजारांची तरतूद, शिवाजी विद्यापीठ मेरीट स्कॉलरशिपची करिता ६० लाख रुपये, विद्यार्थी कला व क्रीडासाठी ८१ लाख, विद्यार्थी सुविधा व इतर तरतुदीसाठी ३ कोटी १२ लाख ५४ हजार, सामाजिक नवोपक्रम, युवा संसद आदींसाठी ३ कोटी २८ लाख ५२ हजार तसेच रिसर्च प्रोग्रॅम आणि स्कील डेव्हलमेंटसाठीही भरीव तरतूद केली आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा बुधवारी आयोजित केली होती. अधिसभेला प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, सर्व विभागांचे अधिष्ठाता, कुलसचिव, वित्त व लेखाअधिकारी, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळे व उपस्थित सर्व सन्माननीय अधिसभा सदस्य उपस्थित होते. विद्यापीठाच्या सन २०२५-२६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२६-२०२७ चे वार्षिक अंदाजपत्रक तयार केले असून सदर अंदाजपत्रकास वित्त व लेखा व समितीच्या ३१.१.२०२६ रोजीच्या



- शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत तूट भरुन काढण्यावर चर्चा
- अंदाजपत्रक विद्यार्थी केंद्रित, संशोधनाला चालना देणारे
- अंदाजपत्रकीय तूट ८ कोटी ९१ लाख रुपये : तुट विद्यापीठ निधीतील शिल्लकेतून भरुन काढणार

बैठकीतील ठराव क्र. २ अन्वये व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली. २१ फेब्रुवारीरोजीच्या बैठकीमध्ये व्यवस्थापन परिषदेने अंदाजपत्रकाची अधिसभेच्या मान्यतेसाठी शिफारस केली आहे. त्यानुसार सदरचे अंदाजपत्रक अधिसभेच्या मंजुरीसाठी सादर केले गेले.

सन २०२६-२०२७ या वर्षात प्रशासकीय विभागांकडून रु. ४७ कोटी ५८ लाख, शास्त्र अधिविभागांकडून रु. ५ कोटी ४० लाख, इतर अधिविभागांकडून रु. ३ कोटी ५९ लाख जमा होण्याची अपेक्षा असून इतर उपक्रमांमधून रु. ३५ कोटी ४ लाख असे एकूण रु. ९२ कोटी ५ लाख विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा अपेक्षित आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून रु.१३४ कोटी ५१ लाख, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी रु.५ कोटी ६ लाख जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून रु.३१ कोटी ६४ लाख इतकी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रक्कमेतून रु.१३ कोटी ७७ लाख इतकी रक्कम जमेकरिता प्रस्तावित केली आहे. निलंबन लेख्यांमधून रु. २८१ कोटी ८४ लाख असे एकूण रु. ५७८ कोटी ८७ लाख जमा अपेक्षित आहे, अशी माहिती दिली. दरम्यान, अधिसभेतीलचर्चेत ॲड. अभिषेक मिठारी, अजित पाटील, श्वेता परुळेकर, गुजर आदी होते.

## कला, क्रीडा तरतुदी

विद्यापीठाच्या वतीने विविध स्पर्धा, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरे यामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय उपचारासाठी रु. २ लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठातील खेळाची मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून रु. ३४ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. विविध खेळाचे साहित्य खरेदी करणेकरिता रु.३० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रक्कम रुपये १५ लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

## सुविधा, इतर तरतुदी

शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ऑनलाईन बुक्स ॲन्ड जनरल्स खरेदीसाठी ग्रंथालय विभागास रु. २ कोटी ६५ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. सध्या विद्यापीठात ५६ इतके परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यांच्या सोयी सुविधेकरिता रु. ३० लाख १० हजार इतकी इतकी तरतूद केली आहे. रिसर्च प्रमोशन स्कीम फॉर पीजी स्टुडंटस् अंतर्गत रु. १० लाख इतकी तरतूद केली आहे. विद्यार्थी सुविधा केंद्राकरिता रुपये २ लाख इतकी तरतूद केली आहे. एज्युकेशन टूर्स टू इंडस्ट्रीसाठी रुपये १५ लाख ५४ हजार इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

## विविध उपक्रमांसाठी भरीव तरतूद

Plagiarism करिता रुपये १८ लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. डीएसडब्ल्यू विभाग अंतर्गत जिल्ह्यातील युवा महोत्सव, केंद्रीय महोत्सव, आविष्कार स्पर्धा, इंद्रधनुष्य तयारी, आव्हान तयारी, युवा संसद, बेटी बचाव अभियान, अवयव दान जागृती कार्यक्रम इ. कार्यक्रमाकरिता रुपये १ कोटी ६६ लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. शिवाजी युनिर्व्हसिटी पोस्ट डॉक्टरल फेलोशिप अंतर्गत रुपये ४० लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. शिवाजी युनिर्व्हसिटी सेंटर फॉर इनोव्हेशन ॲन्ड इन्क्यूबशनसाठी रु. २८ लाख ५२ हजार इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. दिव्यांगासाठी रु.२ कोटी ८० लाख इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

## संशोधनाला चालना

शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी बुक्स ॲन्ड जनरल्स खरेदी व ऑनलाईन सबस्क्रीप्शनसाठी ग्रंथालय विभागास रु. २ कोटी ६५ लाख इतकी तरतूद केली आहे. संशोधनाला चालना देण्याकरिता रिसर्च स्कीम करिता रु. २ कोटी ७५ लाख इतकी तरतूद करण्यात आली आहे. संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी (सॉफ्टवेअर ॲन्ड हार्डवेअर) रु. ४ कोटी १४ लाख तरतूद करण्यात आली आहे.

# शिवाजी विद्यापीठात उद्यापासून राज्यशास्त्र परिषदेचे अधिवेशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग, नेहरू अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. १३ व १४ रोजी राज्यशास्त्र परिषदेच्या ३१ व्या अधिवेशनाचे व दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनात 'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व" यावर चर्चा होणार आहे. अधिवेशनाचे उद्घाटन प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार असून, सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. पाटील असतील. पहिल्या दिवशी बीजभाषण सत्रात प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे हे बीजभाषण करतील. भारतीय राजकीय विचारांची सद्यकालीन प्रस्तुततीया विषयावर प्रा. डॉ. अशोक चौसाळकर मार्गदर्शन करतील. दुसया सत्रात डॉ. के. के. उर्फ काशिनाथ कावळेकर स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत जयदेव डोळे सामाजिक चळवळ आणि राजकारण या विषयावर विचार मांडतील. चौथ्या सत्रात शोधनिबंध सादरीकरण असेल. तरी या महत्त्वपूर्ण चर्चासत्राला आणि अधिवेशनाला राज्यशास्त्र संशोधक, अभ्यासकांनी व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

12 MAR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यावरण, जलप्रदूषणाचे तीव्र पडसाद

## शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत सिनेट सदस्य आक्रमक; अंदाजपत्रातील ८.९१ कोटींच्या तुटीवर चर्चा

- सांडपाणी, मैला, रासायनिक कचरा, घातक पदार्थांच्या व्यवस्थापानकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिसरातील प्रशासकीय इमारती, विविध शैक्षणिक विभाग, प्रयोगशाळा, विद्यार्थी वसतिगृहे, कॅन्टीन, मेस, गेस्ट हाऊस, ग्रंथालय व इतर आस्थापनांमधून दररोज निर्माण होणाऱ्या साडपाणी, मैला, रासायनिक कचरा व घातक पदार्थांच्या व्यवस्थापनाबाबत प्रशासनाने, दुलक्ष केले असल्याचा आरोप करत सिनेट सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले.



कोल्हापूर : अधिसभेत बोलताना प्रभारी कुलगुरू डॉ. राजेंद्र गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे.

शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. राजेंद्र गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी अधिसभा झाली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव प्रो. डॉ. व्ही. एम. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व विभागाचे अधिष्ठाता, वित्त व लेखाअधिकारी, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळे व सदस्य अधिसभेत उपस्थित होते. पर्यावरणीय नियमांचे उल्लंघन सांडपाणी, रासायनिक कचरा यावरील ट्रीटमेंट यंत्रणा (इटीपी, एसटीपी) कार्यान्वित नसल्याबावत विचारणा केली.

पान ९ पाहा

### अधिसभेत ३१ ठराव मान्य, ३२ अमान्य

शिवाजी विद्यापीठात आज सकाळी ११ वाजता सुरु झालेली अधिसभेची बैठक रात्री १० वाजेपर्यंत चालली. सभेत एकूण ६३ ठराव मांडण्यात आले. त्यापैकी ३१ ठराव मान्य करण्यात आले तर ३२ ठराव मागे घेण्यात आले. तसेच २०२४-२५ चा विद्यार्थी विकास मंडळाचा अहवाल आणि २०२४-२५ चा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल मान्य केला गेला. २०२४-२५ मधील विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा कुलसचिव यांचा अहवाल स्वीकृत केला. शिवाजी विद्यापीठाचा ०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ६२ वा वार्षिक अहवाल मान्य केला.

# पर्यावरण, जलप्रदूषणाचे तीव्र पडसाद

पान १ वरून

उजळाईवाडी आणि महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून विद्यापीठाला पाठवलेली नोटीस याबद्दल अधिसभा सदस्यांनी विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. याबाबत सदर बाब न्यायप्रविष्ट असून विद्यापीठाने घेतलेल्या कायदेशीर परवानगीची माहिती सदस्य प्रा. व्ही. एम. पाटील दिली.

अधिसभेत प्रश्नोत्तराच्या तासात २८ प्रश्नापैकी केवळ ६ प्रश्नावर चर्चा झाली. पश्चिम महाराष्ट्रातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्था असलेल्या शिवाजी विद्यापीठात पर्यावरण संरक्षणासंदर्भात गंभीर स्वरूपाचे उल्लंघन होत असल्याची माहिती समोर आली असल्याचे सिनेट सदस्य अॅड. अभिषेक मिठारी यांनी सांगितले. त्याचबरोबर अॅफिलेशन (टी-२) विभागाने किंवा विद्यापीठाने विनाअनुदानित महाविद्यालयावर गेल्या पाच वर्षात अनियमिता, त्रुटी, मूलभूत व भौतिक सुविधा आहेत किंवा नाहीत याची चौकशी करून किती महाविद्यालयावर कारवाई केली? असा प्रश्न उपस्थित करत केलेल्या कारवाईच्या तपशीलाची मागणी सिनेट सदस्यांनी केली.

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात त्रुटीबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२० मधील तरतुदीनुसार कारणे दाखवा नोटीस देण्यात आली व त्यानुसार एका महाविद्यालयातील अतिरिक्त तुकडीसाठी प्रवेश बंदी केली आहे. यामध्ये ३४ महाविद्यालयांची चौकशी पूर्ण झाली असून ३४ महाविद्यालयांपैकी १० महाविद्यालयांना सहा महिन्यात त्रुटीपूर्तता करण्याबाबत कळविल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठाचे सन २०२५-२६ चे सुधारित व सन २०२६-२०२७ चे वार्षिक अंदाजपत्रक बुधवारी अधिसभेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आले. या अंदाजपत्रात ८ लाख ९१ हजार रुपयांच्या तुटबाबत चांगलीच चर्चा झाली. हे अंदाजपत्रक काही सूचना व दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले. शिवाजी विद्यापीठात नुकताच झालेला महानोकरी मेळावा, स्वायत्त महाविद्यालय एनसीसी पुरस्कारासाठी पात्र ठरु शकत नसल्याच्या विद्यापीठ प्रशासनांच्या पत्रावर चर्चा झाली. विद्यापीठातील काही निवासस्थाने खराब झाली असून ती राहण्यालायक नसल्याकडे सदस्यांनी अंगुलीनिर्देश केले. काही निवासस्थाने बंद झाली आहेत; ती दुरुस्त करण्यात येतील, असे सांगण्यात आले.

### गांभियनि पाहणे आवश्यक

सांडपाण्यामध्ये ग्रे वॉटर, ब्लॅक वॉटर व प्रयोगशाळेतून निर्माण होणारे रासायनिक व घातक घटकयुक्त पाण्याचा समावेश आहे. गंभीर बाब म्हणजे या सांडपाण्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया न करता ते थेट जमिनीत मुरवले जात असल्याचे समोर आले आहे. काहीवेळा प्रदूषित पाणी राजाराम तलावत मिसळते. परिसरातील पर्यावरण, भूजल आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असल्यामुळे प्रशासनाने याकडे अत्यंत गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे.

– अॅड. अभिषेक मिठारी, सिनेट सदस्य, शिवाजी विद्यापीठ

### प्रश्नोत्तराचा तास गाजला

अधिसभेत प्रश्नोत्तराचा तास चांगलाच गाजला. काही प्रश्नावरून सिनेट सदस्य आक्रमक झाले होते. ८ अधिसभा झाल्या असून आतापर्यंत काही ठराव पाठपुरावा करून मंजूर करुन घेतले आहेत. ११० ठरावापैकी एकही ठराव पूर्ण झालेला नाही. काही ठरावांची अंमलबजावणी त्या, त्या वेळी व्हायला हवी, अशी मागणी केली. यावर डॉ. गोसावी यांनी विद्यापीठाकडून चांगल्या सुविधा, शिक्षण देणे हे कर्तव्य समजून काम केले जात आहे. पाण्याबाबत गांभियनि विचार केला जाईल, असे सांगितले. श्वेता परुळेकर, अजित पाटील, गुजर आदींनी प्रश्न उपस्थित केले.

### एआयचे विविध अभ्यासक्रम सुरू

एआयच्या शिक्षणाबाबत डॉ. मंजिरी मोरे म्हणाल्या की, यासाठी समिती स्थापन केली आहे. २०२१-२२ पासून एआयचे विविध अभ्यासक्रम सुरू झालेले आहेत. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागात झालेल्या विविध कार्यक्रम आणि राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती त्यांनी दिली. पी. एम. उषांतर्गत एआय सेलला ५० लाखाचा निधी दिला असून डिटेल डीपीआर प्रशासनाला सादर केला आहे. त्यात याबाबतचा रोड मॅप ठरेल.

### विद्यापीठाच्या नोटीसीचे काय झाले?

शिवाजी विद्यापीठात निर्माण होणारे सांडपाणी राजाराम तलावात सोडले जाते. रात्रीच्यावेळी जेसीबी लावून चर खोदला जात आहे. याबाबत पर्यावरणीय परवानगी घेतली आहे का, एटीपी म्हणजे काय, असे प्रश्न सदस्यांनी उपस्थित केले. यावर प्राधिकरणापुढे हे प्रकरण सुनावणीसाठी सुरु असल्याचे प्रशासनाने सांगितले.

जनसंपर्क कक्ष

1 2 MAR 2026 जनप्रवास शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज राज्यशास्त्र परिषदेचे अधिवेशन, राष्ट्रीय चर्चासत्र

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राज्यशास्त्र विभाग, नेहरू अभ्यास केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने १३ व १४ मार्च रोजी राज्यशास्त्र परिषदेच्या ३१ व्या अधिवेशनाचे आणि दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. 'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व' ही मुख्य संकल्पना निश्चित केली आहे. उद्‌घाटन प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार असून, सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती आहे. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील असतील. पहिल्या दिवशी प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे हे बीजभाषण करतील. संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण चव्हाण मनोगत व्यक्त करतील. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. भारती पाटील असतील. पहिल्या सत्रात 'भारतीय राजकीय विचारांची सद्यकालीन प्रस्तुतता' या विषयावर प्रा. डॉ. अशोक चौसाळकर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे असतील. दुसऱ्या सत्रात जयदेव डोळे 'सामाजिक चळवळ आणि राजकारण' यावर विचार मांडतील. अध्यक्षस्थानी डॉ. व्ही. एन. शिंदे असतील. दुसऱ्या दिवशी चौथ्या सत्रात शोधनिबंध सादरीकरण असेल. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. टी. एम. पाटील भूषवतील. पाचव्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार 'जागतिक व्यवस्थेतील नव प्रवाह व भारत' यावर भाष्य करतील.



जनसंपर्क कक्ष
12 MAR 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यशास्त्र परिषदेचे उद्यापासून अधिवेशन

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग, नेहरू अभ्यास केंद्र आणि विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेतर्फे शुक्रवारी (ता. १३) आणि शनिवारी (ता. १४) राज्यशास्त्र परिषदेचे ३१ वे अधिवेशन आणि राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या अधिवेशनाची मुख्य संकल्पना 'राज्यशास्त्रातील नवीन प्रवाहांचे चर्चाविश्व' अशी आहे.

उद्घाटन प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या हस्ते होणार असून, सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील असतील. अधिवेशनात प्राचार्य डॉ. पी. डी. देवरे यांचे बीजभाषण होईल. संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण चव्हाण मनोगत व्यक्त करतील. अध्यक्षस्थानी डॉ. भारती पाटील असतील. त्यानंतरच्या पहिल्या सत्रात 'भारतीय राजकीय विचारांची सद्यःकालीन प्रस्तुतता' विषयावर ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. अशोक चौसाळकर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे असतील. दुसऱ्या सत्रात डॉ. के. के. ऊर्फ काशिनाथ कावळेकर स्मृती व्याख्यानमालेअंतर्गत ज्येष्ठ विचारवंत जयदेव डोळे 'सामाजिक चळवळ आणि राजकारण' या विषयावर विचार मांडतील. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असतील. दुसऱ्या दिवशी चौथ्या सत्रांत शोधनिबंध सादरीकरण असेल. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. टी. एम. पाटील असतील. पाचव्या सत्रांत ज्येष्ठ पत्रकार डॉ. श्रीराम पवार हे 'जागतिक व्यवस्थेतील नव प्रवाह व भारत' या विषयावर भाष्य करतील. अध्यक्षस्थानी डॉ. शिरीषकुमार पवार असतील.

अधिवेशनाचा समारोप राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रा. डॉ. डी. यु. पवार, बी. बी. पाटील, रघुनंदन वराडकर, सिकंदर जमादार, बाळासाहेब भोसले उपस्थित राहणार आहेत.

12 MAR 2026

तरुण भारत

# 'संत तुकारामांचा मानवतावाद'वर आज शाहू स्मारकमध्ये व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्यावतीने 'संत तुकारामांचा मानवतावाद'" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. शाहू स्मारक भवन येथे गुरूवार १२ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता व्याख्यांनाला सुरूवात होणार आहे. कार्यक्रमात संगमनेरचे, उल्हास पाटील मार्गदर्शन करणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपस्थित राहणार आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रा. नंदकुमार मोरे, प्रा. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

12 MAR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी कल्याण, संशोधनावर भर

## शिवाजी विद्यापीठाचा ५८७ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अर्थसंकल्प बुधवारी अधिसभेच्या (सिनेट) बैठकीत सादर करण्यात आला. एकूण ५७८ कोटी ८७ लाख रुपयांची अपेक्षित जमा आणि ५८७ कोटी ७८ लाख रुपयांचा अपेक्षित खर्च असलेल्या या अर्थसंकल्पामध्ये विद्यार्थी केंद्रस्थानी ठेवून तरतुदी करण्यात आल्या आहेत. अर्थसंकल्पामध्ये शिक्षण, संशोधन आणि पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. अर्थसंकल्पात ८ कोटी ९१ लाख रुपयांची तूट दर्शवण्यात आली असून, ती विद्यापीठाच्या शिल्लक निधीतून भरून काढली जाणार आहे. अर्थसंकल्प प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र. कुलगुरू ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये व्यवस्थापन परिषद रघुनाथ ढमकले यांनी सादर केला.

हा अर्थसंकल्प यंदा पूर्णपणे ऑनलाईन (पेपरलेस) पद्धतीने राबवण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय अधिक सक्षम करण्यासाठी वसतिगृहांवर एकूण ४ कोटी ६६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये नवीन वसतिगृहांच्या बांधकामासाठी २.५० कोटी, तर दुरुस्ती व मेसच्या खर्चासाठी २.०५ कोटी रुपये खर्च केले जातील. विशेष म्हणजे, दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधांसाठी २ कोटी ८० लाख रुपयांच्या स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठात सध्या ५६ परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांच्या सोयींसाठी ३० लाख १० हजार,




तर मेरिट स्कॉलरशिपसाठी ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.


संशोधन क्षेत्रात जागतिक स्तरावर ठसा उमटवण्यासाठी विद्यापीठाने संशोधनासाठी भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी २ कोटी ७५ लाख, संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी ४ कोटी १४ लाख आणि ग्रंथालयातील डिजिटल साधनांसाठी (ई-बुक्स व जर्नल्स) २ कोटी ६५ लाख रुपये प्रस्तावित आहेत, तसेच महाविद्यालयीन शिक्षकांच्या संशोधनासाठी २५ लाख आणि पोस्ट डॉक्टरल फेलोशिपसाठी ४० लाख रुपये दिले जाणार आहेत. क्रीडा क्षेत्रासाठी मैदानांची दुरुस्ती, साहित्य खरेदी आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठ परिसरातील रस्ते सुस्थितीत ठेवण्यासाठी घसारा निधीतून २ कोटी आणि नवीन रस्ते तयार करण्यासाठी १ कोटी रुपये खर्च होतील. सुरक्षिततेच्या दृष्टीने कंपाऊंड वॉल बांधण्यासाठी ५० लाख, तर विविध विभागांतील फर्निचर आणि उपकरणांच्या खरेदीसाठी सुमारे १५ कोटी ७३ लाख रुपयांची तरतूद आहे. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटच्या इमारत बांधकामासाठी ५५ लाख रुपये देण्यात आले आहेत. डी. एस. डब्ल्यू. विभागामार्फत आयोजित होणाऱ्या युवा महोत्सव, आविष्कार, युवा संसद आणि इंद्रधनुष्य यासारख्या उपक्रमांसाठी १ कोटी ६६ लाख रुपये खर्च केले जातील. विद्यापीठाने देखभाल, विकास, वेतन, एजन्सी स्कीम आणि निलंबन लेखे अशा पाच विभागांत या अर्थसंकल्पाची विभागणी केली आहे.

### १. रुपया येतो कोठून? (एकूण जमा: ₹५७८.८७ कोटी)




### २. रुपया जातो कोठे? (एकूण खर्च: ₹५८७.७८ कोटी)




**ठळक मुद्दे (Highlights)**

- अर्थसंकल्पीय तूट: ₹८.९१ कोटी (शिल्लक निधीतून भरून काढणार)
- उत्पन्नाचा मुख्य स्रोत: निलंबन लेखे आणि शासकीय अनुदान
- सर्वाधिक खर्च: कर्मचारी वेतन आणि निलंबन लेखे
- उसारा खर्च: मुख्य वेतन आणि निलंबन लेखे

### दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

विभाग तरतूद (कोटी रुपयांत)

- **587.87** कोटी — एकूण अपेक्षित खर्च
- **578.78** कोटी — अपेक्षित जमा
- **02.80** कोटी — दिव्यांग विद्यार्थी सुविधा
- **04.66** कोटी — वसतिगृह विकास व दुरुस्ती
- **02.75** कोटी — संशोधन प्रोत्साहन योजना
- **02.65** कोटी — ग्रंथालय (ई-बुक्स व जर्नल्स)
- **03.00** कोटी — परिसर रस्ते विकास

12 MAR 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधनाला चालना, विद्यार्थी सुविधांवर भर


## विद्यापीठाचे ५८७ कोटींचे अंदाजपत्रक मंजूर; यंदा १७ कोटी ९३ लाखांची घट



■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ११ : प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या कारकिर्दीतील पहिले अंदाजपत्रक आज सिनेटने मंजूर केले. ५७८ कोटी ८७ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकात विद्यापीठाने संशोधनाला चालना देत विद्यार्थी सुविधांवर भर दिला आहे. मात्र, गेल्यावर्षीपेक्षा यंदा १७ कोटी ९३ लाख इतकी अंदाजपत्रकात घट झाली आहे.**

राजर्षी शाहू सभागृहात सिनेट सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी २०२६-२०२७ या वर्षाचे अंदाजपत्रक मांडले. अध्यक्षस्थानी डॉ. गोसावी, तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित होत्या. सिनेट सदस्यांनी अंदाजपत्रकाच्या अनुषंगाने सूचना मांडल्या. त्यावर डॉ. ढमकले, डॉ. गोसावी यांनी स्पष्टीकरण दिले. सुमारे पाऊणतासाच्या चर्चेनंतर सभागृहाने अंदाजपत्रकाला मंजुरी दिली. या अंदाजपत्रकात अपेक्षित जमा ५७८ कोटी ८७ लाख रुपये, तर अपेक्षित खर्च ५८७ कोटी ७८ लाख रुपये आहे. वित्तीय तूट ८ कोटी ९१ लाख रुपये असून, ती विद्यापीठ निधीतील शिल्लकेतून भरून काढणार आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी एकूण २७ कोटी ७४ लाखांची तरतूद असून, ती देखभाल आणि विकासासाठीच्या तरतुदींच्या तुलनेत १६.६९ टक्क्यांनी अधिक आहे. उपकरणे खरेदीसाठी ५ कोटी ८६ लाख, तर रस्ते तयार करण्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या अंदाजपत्रकाबाबत अभिषेक मिठारी, विष्णू खाडे, मनोजकुमार पाटील, संजय परमणे आदींनी संशोधन, स्टार्टअपसाठी निधीची तरतूद वाढवावी. पर्यावरण संवर्धनाच्यादृष्टीने हरित संकल्प मांडवा, अशा सूचना केल्या. त्यावर सकारात्मक कार्यवाही केली जाईल. यावर्षीचे अंदाजपत्रक संशोधनाला चालना देणारे आणि विद्यार्थी केंद्रित असल्याचे प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी सांगितले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सिनेटमध्ये बोलताना प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी. यावेळी शेजारी डॉ. ज्योती जाधव, व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### अपेक्षित जमा-खर्च (कोटींमध्ये)

| विभाग | जमा | खर्च |
|---|---|---|
| प्रशासकीय | ४७.५८ | ६२.९७ |
| शास्त्र | ५.४० | ८.१४ |
| इतर विभाग | ३.५९ | ७.७१ |
| विविध सेवा-इतर उपक्रम | ३५.४८ | ५५.६६ |
| वेतन अनुदान | १५४.५१ | १६३.५१ |
| वेगवेगळ्या संस्था | ५.६ | २.३७ |
| संशोधन व विकास निधी | ३१.६४ | ३१.६४ |
| घसारा निधी | १३.७७ | १३.७७ |
| निलंबन लेखे | २८१.८४ | २४२.०१ |
| एकूण | ५७८.८७ | ५८७.७८ |

### संशोधनासाठीच्या काही ठळक तरतुदी

- बुक्स अँड जर्नल्स खरेदी ............ २ कोटी ६५ लाख
- रिसर्च स्कीम ............ २ कोटी ७५ लाख
- संगणक प्रणाली विकास ............ ४ कोटी १४ लाख
- अधिविभाग, कॉलेजमधील संशोधन कार्यक्रम ............ ८० लाख
- प्रयोगशाळांतील खर्च ............ १४ लाख ४१ हजार
- इतर पायाभूत सुविधा ............ १५ कोटी ७३ हजार

### विद्यार्थी सुविधांसाठी पाठबळ

- शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी ............ २ कोटी ६५ लाख
- परदेशी विद्यार्थी सुविधांसाठी ............ ३० लाख १० हजार
- विद्यार्थी सुविधा केंद्र ............ २ लाख
- एज्युकेशन टूर्स टू इंडस्ट्रीज ............ १५ लाख ५४ हजार
- पीजी स्टुडंटस रिसर्च प्रमोशन स्कीम ............ १० लाख
- डीएसडब्ल्यूचे विविध कार्यक्रम ............ १ कोटी ६६ लाख
- दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ............ २ कोटी ८० लाख
- प्लागॅरिझम रोखणे, पोस्ट डॉक्टोरल फेलोशीप ............ ५८ लाख
- इनोव्हेशन, इन्क्युबेशन सेंटर ............ २४ लाख ५२ हजार
- नवीन वसतिगृह उभारणी ............ २ कोटी ५० लाख
- आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ............ १५ लाख
- विद्यापीठ मेरिट स्कॉलरशिप ............ ६० लाख

### अनियमितता असलेल्या कॉलेजवर कारवाई करा

■ ठरावांची केवळ नोंद घेतली असे उत्तर नको, तर त्याबाबतच्या कार्यवाहीची योग्य माहिती देण्याची मागणी संजय परमणे, श्वेता परुळेकर, धैर्यशील यादव, अभिजित कापसे, मनोज गुर्जर आदी सदस्यांनी केली. त्याबाबतची प्रशासनाची भूमिका प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी समर्पकपणे मांडली. राज्यस्तरीय नोकरी महामेळाव्याबाबत सिनेट सदस्यांनी विद्यापीठाचे कौतुक केले. अनियमितता, त्रुटी असलेल्या आणि मान्यताप्राप्त शिक्षक नसलेल्या कॉलेजवर कडक कारवाई करण्याची आग्रही मागणी प्रकाश कुंभार, डी. एन. पाटील आदी सदस्यांनी केली. विद्यार्थी विकास मंडळ, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ आणि २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ६२ वा वार्षिक अहवाल सभागृहाने मान्य केला. विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा कुलसचिवांचा अहवाल स्वीकृत केला.

### फटकेबाजी अन् शेरोशायरी

■ सुरुवातीपासून प्रभारी कुलगुरू डॉ. गोसावी यांनी अगदी खेळीमेळीत फटकेबाजी करत सभेचे कामकाज पुढे नेले. त्यामुळे चर्चेतील तणावाच्या स्थितीनंतरही सभागृहात हास्य फुलत राहिले. आवश्यक तिथे ढील देत, पाहिजे तिथे चाप लावत. कधी पुणेरी शालजोडी, तर कधी थेट समज देत त्यांनी कामकाजावर फुल्ल कंट्रोल राखले. अंदाजपत्रकावर मत मांडताना सदस्य अभिषेक मिठारी यांनी शेरोशायरी सादर केली, तर मनोजकुमार पाटील यांनी हरित संकल्पाची कविता सादर केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 MAR 2026

लोकमत


# शिवाजी विद्यापीठाच्या अंदाजपत्रात संशोधनासाठी तब्बल २२७ कोटी

## ५८७ कोटींचे अंदाजपत्रक : ८ कोटी ९१ लाखांची तूट निधीतील शिलकेतून भरून काढणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने संशोधनात्मक सुविधांवर भर देतानाच २०२६-२७ साठी ५८७ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक बुधवारी झालेल्या विद्यापीठाच्या अधिसभेत चर्चेनंतर मंजूर करण्यात आले. तब्बल ८ कोटी ९१ लाख रुपयांच्या तुटीचे हे अंदाजपत्रक असून, ही तूट विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरून काढण्यात येणार आहे.

कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू सभागृहात शिवाजी विद्यापीठाची अधिसभा झाली. यावेळी प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. डॉ. रघुनाथ ढमकले यांनी २०२६-२७चे अंदाजपत्रक मांडले. यावर सदस्यांनी चर्चेनंतर मंजुरी दिली. या अंदाजपत्रकात संशोधनाला चालना देण्यात आली असून, तब्बल २७ कोटी रुपयांची तरतूद संशोधनासाठी केली आहे.



### संशोधनाला मिळणार चालना

दर्जेदार संशोधन होण्यासाठी पुस्तके, जर्नल खरेदी व ग्रंथालयासाठी २ कोटी ६५ लाख, संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी ४ कोटी १४ लाख, संगणक, फर्निचर, इलेक्ट्रिकलच्या पायाभूत सुविधांसाठी १५ कोटी ७३ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

### मैदानांच्या देखभालीसाठी ३४ लाखांची केली तरतूद

विद्यापीठातील मैदानांच्या देखभाल - दुरुस्तीसाठी घसारा निधीतून ३४ लाख रुपयांची तरतूद केली असून, खेळाचे साहित्य खरेदीसाठी ३० लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेता यावा, यासाठी १५ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

### विभागवार जमा, खर्च अपेक्षित

| विभाग | जमा अपेक्षित | खर्च अपेक्षित |
|---|---|---|
| प्रशासकीय | ४७ कोटी ५८ लाख | ६२ कोटी ९७ लाख |
| शास्त्र अधिविभाग | ५ कोटी ४० लाख | ८ कोटी १४ लाख |
| इतर अधिविभाग | ३ कोटी ५९ लाख | ७ कोटी ७१ लाख |
| इतर उपक्रम | ३५ कोटी ४८ लाख | ५५ कोटी ६६ लाख |
| वेतन अनुदान | १५४ कोटी ५१ लाख | १६३ कोटी ५१ लाख |
| विविध संस्था | ५ कोटी ०६ लाख | २ कोटी ३७ लाख |
| संशोधन-विकास निधी | ३१ कोटी ६४ लाख | ३१ कोटी ६४ लाख |
| घसारा निधी | १३ कोटी ७७ लाख | १३ कोटी ७७ लाख |
| निलंबन लेखे | २८१ कोटी ८४ लाख | २४२ कोटी ०१ लाख |

### दहा तास सभा चालली.

१ शिवाजी विद्यापीठात बुधवारी सकाळी ११ वाजता सुरू झालेली अधिसभेची बैठक रात्री १० वाजेपर्यंत चालली. सभेत एकूण ६३ ठराव मांडण्यात आले.

२ त्यापैकी ३१ ठराव मान्य करण्यात आले तर ३२ ठराव मागे घेण्यात आले तसेच २०२४-२५ चा विद्यार्थी विकास मंडळाचा अहवाल आणि २०२४-२५ चा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल मान्य केला गेला.

३ २०२४-२५ मधील विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा कुलसचिव यांचा अहवाल स्वीकृत केला. शिवाजी विद्यापीठाचा०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ६२ वा वार्षिक अहवाल मान्य करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 MAR 2026

पुढारी


# विद्यार्थिकेंद्रित, संशोधनाभिमुख ५८७ कोटींचे अंदाजपत्रक मंजूर

## ८ कोटी ९१ लाखांची तूट; विद्यापीठ निधी शिलकीतून तूट भर काढली जाणार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे २०२६-२७ साठीचे विद्यार्थिकेंद्रित व संशोधनाला चालना देणारे ५८७ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक बुधवारी झालेल्या अधिसभेत चर्चेनंतर मंजूर करण्यात आले. तब्बल ८ कोटी ९१ लाख रुपयांच्या तूटीचे हे अंदाजपत्रक असून ही तूट विद्यापीठ निधीतील शिलकेतून भरून काढण्यात येणार आहे.

प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली राजर्षी शाहू सभागृहात अधिसभा झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले यांनी २०२६-२७ चे अंदाजपत्रक मांडले. यावर सदस्यांच्या चर्चेनंतर मंजुरी दिली. ५७८ कोटी ८७ लाख रुपये अपेक्षित खर्च असून ५८७ कोटी ७८ लाख रुपये एकूण खर्च अपेक्षित आहे. अंदाजपत्रक पाच विभागात विभागले आहे. अंदाजपत्रकात संशोधनासाठी तब्बल २७ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यासह वसतिगृह, शिष्यवृत्ती, विद्यार्थी कला व क्रीडा, इतर सुविधांसाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत.



अंदाजपत्रकानुसार प्रशासकीय ४७ कोटी ५८ लाख ६२ कोटी ९७ लाख, शास्त्र अधिविभाग ५ कोटी ४० लाख ८ कोटी १४ लाख, इतर अधिविभाग ३ कोटी ५९ लाख ७ कोटी ७१ लाख, इतर उपक्रम ३५ कोटी ४८ लाख ५५ कोटी ६६ लाख, वेतन अनुदान १५४ कोटी ५१ लाख १६३ कोटी ५१ लाख, विविध संस्था ५ कोटी ०६ लाख २ कोटी ३७ लाख, संशोधन-विकास निधी ३१ कोटी ६४ लाख ३१ कोटी ६४ लाख, घसारा निधी १३ कोटी ७७ लाख १३ कोटी ७७ लाख, निलंबन लेखे २८१ कोटी ८४ लाख २४२ कोटी १ लाख असे एकूण ५७८ कोटी ८७ लाख रुपये जमा होणे अपेक्षित आहे.

**संशोधनाला मिळणार चालना**

दर्जेदार संशोधन होण्यासाठी

### ११ विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण

विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन केला आहे. याचा अहवाल या बैठकीत सादर करण्यात आला. यात ११ विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले.

### मैदानांच्या देखभालीसाठी ३४ लाख रुपये

विद्यापीठातील मैदानांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी घसारा निधीतून ३४ लाख रुपयांची तरतूद केली आहे. खेळाचे साहित्य खरेदीसाठी ३० लाख रुपये, खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेता यावा यासाठी १५ लाख रुपये, खेळ, सांस्कृतिक कार्यक्रम, शिबिरांसाठी २ लाखांचा खर्च करण्यात येणार आहेत.

पुस्तके, जर्नल खरेदी व ग्रंथालयासाठी २ कोटी ७५ लाख, संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी ४ कोटी १४ लाख, संगणक, फर्निचर, इलेक्ट्रिकल आदी पायाभूत सुविधांसाठी १५ कोटी ७३ लाख रुपयांची तरतूद केली आहे. तसेच महाविद्यालये आणि विद्यापीठ अधिविभाग संशोधन कार्यक्रमासाठी ८० लाख रुपयांची तरतूद केली आहे.

**वसतिगृहे होणार चकाचक; भरीव तरतूद**

विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या वसतिगृहासाठी चालू अंदाजपत्रकात ४ कोटीहून अधिक रुपयांची भरीव तरतूद केली आहे. नवीन वसतिगृहासाठी २ कोटी ५० लाख, वसतिगृह दुरुस्ती, मेसची दुरुस्ती व दैनंदिन खर्चासाठी २ कोटी १६ लाख रुपयांची तरतूद केली आहे. कमवा व शिका मुलींचे वसतिगृह सुविधा व दैनंदिन खर्चासाठी ३२ लाख ९२ रुपये, रिसर्च स्कॉलर होस्टेलसाठी १२ लाखांची तरतूद केली आहे. मेरीट स्कॉलरशिपसाठी ६० लाख तरतूद केली आहे.

### आधिसभेत ३१ ठराव मान्य, ३२ अमान्य दहा तास सभा चालली

शिवाजी विद्यापीठात आज सकाळी ११ वाजता सुरू झालेली अधिसभेची बैठक रात्री १० वाजेपर्यंत चालली. सभेत एकूण ६३ ठराव मांडण्यात आले. त्यापैकी ३१ ठराव मान्य करण्यात आले तर ३२ ठराव मागे घेण्यात आले. तसेच २०२४-२५ चा विद्यार्थी विकास मंडळाचा अहवाल आणि २०२४-२५ चा क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाचा वार्षिक अहवाल मान्य केला गेला.२०२४-२५ मधील विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाचा कुलसचिव यांचा अहवाल स्वीकृत केला. शिवाजी विद्यापीठाचा २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील ६२ वा वार्षिक अहवाल मान्य करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 MAR 2026

तरुण भारत

# विद्यार्थी सुविधा, संशोधनाला चालना

## विद्यापीठाच्या अधिसभेत दीर्घ चर्चा; ५८१.७८ कोटींच्या अंदाजपत्रकास मंजुरी

**शिवाजी विद्यापीठाचे सन २०२५–२६ चे सुधारित व सन २०२६–२०२७ चे वार्षिक अंदाजपत्रकावर बुधवारी अधिसभेत दीर्घ चर्चा चालली. अधिसभेत सिनेट सदस्यांनी प्रश्न उपस्थित करत अंदाजपत्रकातील तुटीकडे लक्ष वेधले. अधिसभेत ५८१ कोटी ७८ लाख रूपयाचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी सादर करण्यात आले. या अंदाजपत्रकात २०२६–२०२७ ची एकूण अपेक्षित जमा ५७८ कोटी ८७ लाख रुपये असून अंदाजपत्रकीय तूट ८ कोटी ९१ लाख रुपये इतकी आहे. ही तूट विद्यापीठ निधीतील शिल्लकेतून भरून काढण्यात येणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले.**

प्रतिनिधी

कोल्हापूर

या अंदाजपत्रकात विद्यार्थी सुविधा व इतर तरतुदीसाठी ३ कोटी १२ लाख ५४ हजार, क्रीडा साहित्य खरेदीसाठी ३० लाख, मेरीट स्कॉलरशिपची करिता ६० लाख रुपये, विद्यार्थी, विद्यार्थीनी

तरुण भारत संवाद



विद्यापीठातून

वसतिगृह दुरुस्तीसह अनुषंगिक सुविधांसाठी ११ कोटी ८१ लाख ९२ हजारांची तरतूद, विद्यार्थी कला व क्रीडासाठी ८१ लाख, सामाजिक नवोपक्रम, युवा संसद आदींसाठी ३ कोटी २८ लाख ५२ हजार तसेच रिसर्च प्रोग्रॅम आणि स्कील डेव्हलमेंटसाठीही भरीव तरतूद केली आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी होते.

विद्यार्थी कला, क्रीडा, शिष्यवृत्ती, विद्यार्थी केंद्रित आणि संशोधनाला चालना देणारा अंदाजपत्रक असल्याचे प्रभारी कुलगुरू डॉ. राजेंद्र गोसावी यांनी सांगितले.

### असे आहे अंदाजपत्रक

या वर्षात प्रशासकीय विभागांकडून ४७ कोटी ५८ लाख, शास्त्र अधिविभागांकडून ५ कोटी ४० लाख, इतर अधिविभागांकडून ३ कोटी ५९ लाख जमा होण्याची अपेक्षा असून इतर उपक्रमांमधून रु. ३५ कोटी ४ लाख असे एकूण रु. ९२ कोटी ५ लाख विद्यापीठाच्या स्वनिधीत जमा अपेक्षित आहे. वेतन अनुदानापोटी शासनाकडून रु. १३४ कोटी ५१ लाख, तर वेगवेगळ्या संस्थांकडून विविध प्रकल्पांसाठी ५ कोटी ६ लाख जमा अपेक्षित आहे. विद्यापीठाच्या संशोधन व विकास निधीतून ३१ कोटी ६४ लाख इतकी रक्कम व घसारा निधीच्या शिल्लक रक्कमेतून रु.१२ कोटी ७७ लाख इतकी रक्कम जमेकरिता प्रस्तावित केलेली आहे. निलंबन लेख्यांमधून रु. २८१ कोटी ८४ लाख असे एकूण रु. ५७८ कोटी ८७ लाख जमा होणे अपेक्षित आहे.

तरतूद : प्रशासकीय विभाग ६२.९७ कोटी, शास्त्र अधिविभाग ८.१४ कोटी, इतर अधिविभाग ७.७१ कोटी, विविध सेवा व इतर उपक्रम ५५.६६ कोटी, असा विद्यापीठ स्वनिधीमधील १३४.४८ कोटी, खर्च अपेक्षित आहे. वेतन अनुदान खर्च १६३.५१ कोटी, विविध वित्तीय संस्थांच्या निधीमधून खर्चासाठी २.३७ कोटी, तसेच संशोधन व विकास निधी ३१.६४ कोटी, घसारा निधी १२.७७ कोटी निलंबन लेखे २४२.१ कोटी.

### शैक्षणिक पाया भक्कम करणारे अंदाजपत्रक

अंदाजपत्रकात संशोधन, शैक्षणिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तरतुदींचा समावेश आहे. विद्यापीठाच्या सर्वांगिण विकासाचा विचार करणारे अंदाजपत्रक आहे. या अंदाजपत्रकामुळे विद्यापीठच्या सर्वकश बाबींना चालना मिळेल.

– **डॉ. राजेंद्र गोसावी**, प्रभारी प्र–कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ